ePaper

**दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदियांवर FIR दाखल; 14 तासांच्या तपासानंतर सीबीआय पथक रवाना**



| वर्ष - 6 | अंक - 133 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- देवेंद्र फडणवीसांना पुण्यातून दिल्लीला पाठवा
- प्राधिकरण विलिनीकरणाचा मुद्दा विधानसभेत गाजला
- ‘मुख्यमंत्र्यांचे दहीहंडी पर्यटन

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 20 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आमचे पैसे घेता ना, मग सुविधा द्या!

## आमदार लक्ष्मण जगताप : ‘पीएमपीएमएल’ प्रशासनाला खडसावले

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**





> शहरातील विविध मार्गावर बससेवा सुरू करणे व बस फेऱ्या वाढवण्याबाबत शहराच्या महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, अन्य पदाधिकारी व सर्वपक्षीय नगरसेवक यांच्याकडून वारंवार सूचना व उपाययोजना करण्याबाबत सूचना करूनही पीएमपीएमएलकडून ठोस कार्यवाही होत नाही, हे दुर्दैवाने सांगावे लागत आहे. पीएमपीएमएल प्रशासनाने पिंपरी-चिंचवड शहराबाबतच्या कारभारात आता सुधारणा करावी, अशी माझी सूचना आहे. तसेच किवळे, मुकाई चौक येथील बीआरटीएस बस टर्मिनलचा तातडीने पूर्ण क्षमतेने वापर करण्यास सुरूवात करावी. किवळे ते पुणे विमानतळ, किवळे ते स्वारगेट, देहूरोड ते हिंजवडी फेज-३, किवळे ते आळंदी, किवळे ते चाकण एमआयडीसी, देहूरोड ते पिंपरीगाव या मार्गावर बस पूर्ववत सुरू करण्यात यावी, अशी सूचना पीएमपीएमएल प्रशासनाला केली आहे.
> - **लक्ष्मण जगताप,** आमदार, चिंचवड विधानसभा.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत किवळे येथील मुकाई चौकात सात वर्षापूर्वी पीएमपीएमएलसाठी सुसज्ज बीआरटीस बस टर्मिनल उभारण्यात आले आहे. महापालिकेने लाखो खर्च करून उभारलेल्या या बस टर्मिनलचा पूर्ण क्षमतेने वापर होत नसल्याने आमदार लक्ष्मण जगताप यांनी पीएमपीएमएलला खरमरीत पत्र लिहून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या बस टर्मिनलच्या आसपास दाट लोकसंख्येच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील विविध महत्वाच्या ठिकाणी जाण्यासाठी गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत पीएमपीएमएलला दरवर्षी कोट्यवधी देऊनही आणि बस मार्गांवर सोयीसुविधांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही आमच्या शहरातील प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत असेल, तर हे पीएमपीएमएलचे अपयश आहे. आमचे पैसे घेता, तर या शहरातील नागरिकांना चांगली प्रवासी सुविधा द्या, आणि किवळे येथील मुकाई चौकातील बीआरटीएस बस टर्मिनलचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यात यावा, अशी मागणी सूचना त्यांनी पीएमपीएमएलच्या सहव्यवस्थापकीय संचालकांना केली आहे. यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, “चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी मला त्यांचे लोकप्रतिनिधीत्व करण्याची संधी दिल्यापासून या मतदारसंघाचा विकासातून कायापालट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार किवळे येथील मुकाई चौकात सुसज्ज बस टर्मिनल उभारण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यानंतर याठिकाणी सप्टेंबर २०१५ मध्ये सुसज्ज बीआरटीएस बस टर्मिनल उभारण्याचे काम पूर्ण होऊन त्याचे लोकार्पण करण्यात आले. औंधला लागून असलेल्या सांगवी फाटापासून ते किवळे या मुख्य बीआरटीएस रस्त्याच्या शेवटच्या टोकाला हे बीआरटीएस बस टर्मिनल उभारण्यात आले आहे. त्यावर पिंपरी-चिंचवड महापालिकेने लाखो रुपये खर्च केले आहेत. पण गेल्या सात वर्षात या बस टर्मिनलचा पूर्ण क्षमतेने वापर होत नसल्याचे दिसत आहे. हे पीएमपीएमएल प्रशासनाचे पूर्णपणे अपयश आहे.


किवळे, मुकाई चौक येथून पुणे मनपा भवन आणि निगडी या दोनच मार्गावर बस उपलब्ध आहेत. मुकाई चौकापासून चौफेर असलेल्या रावेत, किवळे, मामुर्डी, साईनगर, दत्तनगर, उत्तमनगर, भीमाशंकरनगर इत्यादी दाट वस्तीच्या भागातील नागरिकांसाठी पीएमपीएमएल प्रशासन फिडर रुटसुद्धा सुरू करू शकलेले नाही. त्यामुळे येथील नागरिकांची सार्वजनिक प्रवासासाठी प्रचंड गैरसोय आहेत.

खासगी वाहने आणि रिक्षाने प्रवास करून या नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका पीएमपीएमएलला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे अनुदान देते. तसेच विवध बस मार्गांवर सोयीसुविधा उभे करण्यासाठीही महापालिका दरवर्षी स्वतःचे कोट्यवधी रुपये खर्च करते. एवढा खर्च करूनही पिंपरी-चिंचवडमधील जनतेला चांगली सार्वजनिक सुविधा पुरवली जात नसेल तर ते पीएमपीएमएल प्रशासनाचे अपयशच म्हणावे लागेल.

# सावधान! पिंपरी-चिंचवडमध्ये स्वाईन फ्लूचा शिरकाव!

## प्रशासनाकडून सतर्कतेचे आवाहन : आतापर्यंत दोन रुग्णांचा मृत्यू, 21 जणांना बाधा

**वडगाव मावळ ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



> गंभीर स्वाईन फ्ल्यु रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स आणि अवैद्यकिय कर्मचारी, गरोदर महिला, उच्च रक्तदाब व मधुमेह असलेले रुग्ण (अति जोखिमचे) यांच्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये स्वाईन फ्ल्यु (H1N1) प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येत आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा.
> - डॉ.पवन साळवे

**नागरीकांना आवाहन**

- वारंवार साबण व स्वच्छ पाण्याने हात धुवा.
- पौष्टिक आहार घ्या. ■ लिंबू, आवळा, मोसंबी, संत्री, हिरव्या पालेभाज्या या सारख्या आरोग्यदायी पदार्थांचा आहारात वापर करा.
- धुम्रपान टाळा, पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या. ■ भरपूर पाणी प्या. ■ हस्तांदोलन टाळा. ■ सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका. ■ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेऊ नका. ■ आपल्याला फ्ल्यु सदृश्य लक्षणे असतील तर गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका.

कोरोना पाठोपाठ शहरात आता स्वाईन फ्ल्युने शिरकाव केला आहे. सध्यस्तितीत महापालिका कार्यक्षेत्रात स्वाईन फ्ल्यु (H1N1) आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अद्यापपर्यंत २१ रुग्ण स्वाईन (फ्ल्यु (H1N1) आजाराने बाधीत झाले असुन २ संशयित स्वाईन फ्ल्यू (H1N1) रुग्णांचा मृत्यु झालेला असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. पवन साळवे यांनी दिली आहे.

या आजाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. याबाबत देण्यात आलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, १) ताप २) घसादुखी, घशाला खवखव ३) खोकला, नाक गळणे ४) अंगदुखी ५) डोकेदुखी बालरुग्णांमध्ये सौम्य ते मध्यम स्वरूपाचा ताप आढळतो. घसादुखी असणा-या बाळांमध्ये तोंडातून अतिप्रमाणात लाळ गळताना आढळते. त्या अनुषंगाने सध्या आढळून येत असलेल्या इन्फ्लुएंझा (ए एच १ एन १) केसेस पाहता सर्वसामान्य जनतेसाठी वैयतिक पातळीवरील इन्फ्लुएंझा (ए एच १ एन १) प्रतिबंधाच्या महत्वपूर्ण उपाययोजना व खबरदारी म्हणून खालील काळजी घेणेबाबत य विभागामार्फत नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

# देवेंद्र फडणवीसांना पुण्यातून दिल्लीला पाठवा!

## भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे ब्राह्मण महासंघाची पत्राद्वारे सर्वांत आधी मागणी

पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रात जाणार असल्याची चर्चा गेल्या काही वर्षांपासून होत आहे. त्यातच आता लोकसभेच्या आगामी २०२४ च्या निवडणुकीत फडणवीस यांना पुण्यात उमेदवारी द्यावी, अशी मागणी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने थेट भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पत्र लिहून केली आहे. फडणवीसांच्या दिल्लीतील राजकारणाची सुरुवात पुण्यात व्हावी, अशी इच्छाही ब्राह्मण महासंघाने व्यक्त केली आहे.**



भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक समितीत देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागली आहे. ही नियुक्ती म्हणजे फडणवीस हे केंद्रात जाण्याचे संकेत आहेत, अशी चर्चा राज्याच्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यांच्या निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी ब्राह्मण महासंघ फडणवीस यांच्यासाठी सक्रीय झाल्याचे दिसत आहे. महासंघाच्या वतीने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना पत्र लिहिण्यात आले आहे. त्यात २०२४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांना पुण्यातून खासदारकीचे तिकिट द्यावे, अशी मागणी केली आहे.

भाजप नेत्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, अखिल भारतीय महासंघ पुण्यात प्रत्येक निवडणुकीत भाजपच्या मागे ठामपणे उभा राहिला आहे, त्यामुळे २०२४ ला देखील फडणवीस यांना निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. तुम्ही केंद्रीय निवडणूक समितीत फडणवीस यांची जी निवड केली आहे, ती अतिशय सार्थ आहे. दिल्लीतील राजकारणाची फडणवीस यांची सुरुवात पुण्यातून हवी, अशी इच्छादेखील महासंघाची आहे.

फडणवीस हे भाजपचे भविष्य असून नरेंद्र मोदी यांच्यानंतर सक्षम नेतृत्वाची चर्चा होते, त्यात देवेंद्र यांचे नाव अग्रभागी असते. निवडणूक समितीमधील निवड ही फडणवीस यांची राष्ट्रीय राजकारणातील सुरुवात मानली जात आहे. भाजपकडून फडणवीस यांच्यासाठी सुरक्षित मतदारसंघ शोधला जात असल्याची चर्चा दूरचित्रवाणीवर होत आहे. पुणे हा ब्राह्मण महासंघाचा गड असून फडणवीस यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे आहेत, त्यामुळे पुण्यातून फडणवीस यांची उमेदवारी जाहीर करावी, असे साकडेही महासंघाने भाजप नेत्यांना घातले आहे.

### अन् मोहोळ-मुळीकांच्या पोटात गोळा !

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुण्यातून खासदारकीची उमेदवारी द्यावी, अशी मागणी ब्राह्मण महासंघाने केली आहे. महासंघाची मागणी प्रत्यक्षात आल्यास भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक आणि माजी महापौर मुरलीधर मोहोळ या इच्छुकांची खासदारकीची संधी हुकणार आहे. मोहोळ हे पुण्याचे माजी महापौर आहेत तर मुळीक विद्यमान शहराध्यक्ष आहेत. या दोघांच्या मनात पुण्याच्या खासदारकीची इच्छा आहे. या दोघांच्या नावाची चर्चादेखील गेल्या वर्षभरापासून होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री फडणवीस पुण्यातून खासदारकी लढणार अशी चर्चा सुरू झाली. मात्र, आज ब्राम्हण महासंघाने भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे फडणवीस यांना पुण्यातून खासदारकीची उमेदवारी द्यावी, अशी थेट मागणी केली आहे. ब्राम्हण महासंघाच्या मागणीने पुण्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. विद्यमान शहराध्यक्ष जगदीश मुळीक २०१४ ते २०१९ या काळात वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. २०१९ च्या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे कोथरूडमधून गेली अनेक वर्षे नगरसेवक असलेले मुरलीधर मोहोळ हेदेखील खासदारकीसाठी इच्छुक आहेत. २०१७ मध्ये पुणे महापालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यानंतर मुरलीधर मोहोळ यांना सुरुवातीला स्थायी समितीचे अध्यक्ष आणि त्यानंतर महापौरपदाची संधी मिळाली. सलग अडीच वर्ष ते पुण्याचे महापौर होते. मोहोळ यांची महापौरपदाची मुदत मार्चमध्ये संपली. गेल्या वर्षभरापासून पुण्यातून लोकसभा लोकसभेसाठी लोकसभेचे उमेदवार म्हणून माजी महापौर मुरलीधर मोहोळ व शहराध्यक्ष जगदीश मुळीक या दोन नावांची प्रामुख्याने चर्चा होती. त्यातही मोहोळ यांचे नाव आघाडीवर होते. ब्राह्मण महासंघाने आज केलेल्या मागणीनुसार देवेंद्र फडणवीस यांची खरोखरच पुण्यातून उमेदवारी निश्चित झाली तर मुरलीधर मोहोळ आणि जगदीश मुळीक यांची खासदार होण्याची संधी किमान यावेळी तरी हुकली असेच म्हणावे लागेल.**

# पुण्याचा पालकमंत्री ठरला का? चंद्रकांत पाटलांनी स्पष्टच सांगितले...

## फडणवीस यांनी आगामी लोकसभा निवडणूक ही पुण्यातून लढविण्याची होतेय मागणी

पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पुण्याचे पालकमंत्री कोण होणार, याविषयी गेल्या अनेक दिवसांपासून राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. कारण पुण्यातील राजकीय केंद्रबिंदू हाच पालकमंत्री राहणार आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच पुण्याचे पालकमंत्री होतील,अशी जोरदार चर्चा होत आहे. मात्र अद्याप पुण्याचा पालकमंत्री ठरला नाही, अशी प्रतिक्रिया भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.

नव्या सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार झाल्यानंतर भाजप नेते आणि



राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस आणि मंत्री चंद्रकात पाटील हे शिरूर येथे माजी आमदार बाबूराव पाचर्णे यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांना शिक्रापूरकर परिसरातील पदाधिका-यांनी गराडा घालताच वाबळेवाडी शाळेचा विषय उपस्थित झाला. यावेळी वाबळेवाडीचे वतीने सतीश वाबळे यांनी पुढे होत चंद्रकांत पाटलांना हा विषय सांगण्याचा प्रयत्न करताच त्यांनी वाबळे तसेच राजाभाऊ मांढरे यांना सूचित केले की, `तुम्ही आता पुढे व्हा अन बोला तुमच्या पालकमंत्र्यांशी! अशी सूचना केली होती. त्यावेळपासून फडणवीस हे पुण्याचे पालकमंत्री होणार, अशी जोरदार चर्चा होत आहे.

याबरोबरच आता फडणवीस यांनी आगामी लोकसभा निवडणूक ही पुण्यातून लढवावी, अशी मागणी आजच अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांना पत्र लिहून केली आहे. यामुळे खरच फडणवीस पुण्याचे पालकमंत्री होतील का? , अशा चर्चा रंगायला सुरू झाल्या आहेत.

याआधी कोल्हापूरवरून येत कोथरूड विधानसभा मतदारसंघात चंद्रकांत पाटील यांनी निवडणूक लढवली होती आणि त्यानंतर त्यांना पुण्याच पालकमंत्रीपद दिल होत. त्यामुळे यावेळी पुण्यासारख्या महत्वाच्या आणि २१ विधानसभा मतदारसंघ असलेल्या जिल्यातच राष्ट्रवादीला घेरण्याचा भाजपचा प्रयत्न असू शकतो, मात्र अद्याप अधिकृतरित्या पालकमंत्री म्हणून कुणाच्याच नावाची घोषणा झालेली नाही. यामुळे याबाबात रोजच चर्चा होत आहेत. आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधतांना पाटील यांनी पुन्हा एकदा पालकमंत्री अजून ठरला नसल्याचे सांगितले आहे.

याचबरोबर पाटील यांनी दहीहंडी उत्सवाबद्दल बोलतांना म्हणाले की, कोरोनामुळे २ वर्ष कुठेले ही सण आपल्याला साजरा करता आला नाही. सगळीकडे बंधन होती. मात्र कोरोना संपला आहे असं म्हणता येणार नाही. पण त्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. त्यामुळे सगळे सण आपण उत्साहात साजरे करणे सुरू केले आहे. या सरकार ने लोकांच्या भावना लक्षात घेऊन सुट्टी घोषित केली आहे. याबरोबरच १० लाखांचा विमा आपण गोविंदांना दिला आहे. दहीहंडी हा खेळांच्या यादीत सामील झाला आहे. मात्र दिलेल्या आरक्षणाबाबत काही गैरसमज झाला आहे. खेळाडूंना वेगळं आरक्षण दिले आहे असे अनेकांना वाटत आहे. पण तसे नसून खेळाच्या कोट्यामध्ये हे आरक्षण दिल्याचे पाटलांनी स्पष्ट केले.

### भूमिपूत्रांचा परतावा, अधिकारांमध्ये सुस्पष्टता नाही

# प्राधिकरण विलिनीकरणाचा मुद्दा विधानसभेत गाजला!

## आमदार महेश लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे महाविकास आघाडी सरकारच्या काळात तडकाफडकी पुणे प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मध्ये विलीन करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी संपादनाचा मोबदला आणि मिळकती हस्तांतरणाची किचकट प्रक्रिया याबाबत कसलीही ठोस कार्यवाही नाही. महापालिका आणि पीएमआरडीच्या अधिकारांमध्येही सुस्पष्टता नाही. मग, प्राधिकरण विलिनीकरणाच्या निर्णय कशासाठी घेतला? असा सवाल भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित केला.**





मुंबईत विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनामध्ये आमदार महेश लांडगे यांनी प्राधिकरण विलिनीकरणाच्या मुद्याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले. यासह राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर मागणीचे निवेदनही दिले आहे. तत्पूर्वी, लक्षवेधी आणि प्रश्नोत्तराच्या तासाची प्रतीक्षा न करता औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी मिळली असता, आमदार लांडगे यांनी सभागृहात भूमिपुत्र आणि प्राधिकरणवासीयांची बाजू मांडली.

आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमध्ये विलीनीकरण करण्यात आले आहे. मात्र, मिळकती हस्तांतरण आणि भूमिपूत्र जागा मालकांच्या मागण्यांसाठी वेळकाढूपणा केला जातो. प्राधिकरण आणि पीएमआरडीए याचा दूरपर्यंत संबंध नसताना विलीनीकरणाचा अन्यायकारक निर्णय कसा घेण्यात आला? याबाबत सभागृहाने पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. प्राधिकरणाच्या स्थापनेपासून ५० वर्षांतील ४५ वर्षे काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता राज्यात आणि प्राधिकरणावर वर्चस्व होते. याला अपवाद फक्त फडणवीस सरकार असताना भाजपा काळात अध्यक्ष सदाशीव खाडे यांच्या माध्यमातून प्राधिकरणाच्या सहाय्याने संविधान भवन, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचा विकास, पंतप्रधान आवास योजना, शैक्षणिक संस्थांच्या शाखा, पोलीस आयुक्तालया प्राधिकरणाची जागा देणे, स्पाईन रोड हक्काची जागा उपलब्ध करुन देणे, तसेच उद्यान, ट्राफिक पार्क, नाल्याचे तळ्याचे सुशोभीकरण, क्रीडांगणे व क्लब हाऊस, शॉपिंग व पार्किंग, स्पाइन रस्त्यावर कुदाळवाडी चौकात उड्डाणपूल, बहुउद्देशीय हॉल बांधकाम, भाजी मंडई, आकुर्डी डी.सी. येथे ॲडव्हेंचर पार्क, विरंगुळा पार्क, साई चौक उड्डाणपूल बांधणेचे काम असे विविध प्रकल्प भाजपाच्या ५ वर्षांच्या काळात मार्गी लावण्यात आले. अडीच वर्षे महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर संबंधित विकासकामांना खो बसला. त्यानंतर प्राधिकरण विलीनीकरण करण्याचा स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेताच निर्णय घेण्यात आला, ही बाब राज्य सरकारने लक्षात घेतली पाहिजे.

> “पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे क्षमता असताना प्राधिकरण विलीनीकरणासाठी पहिले प्राधान्य महानगरपालिकेला देणे अपेक्षीत होते. मात्र, ज्या महानगरविकास प्राधिकरणाकडे एखादे प्रकरण दाखल झाले, तर त्या प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी दोन-तीन वर्षे वाट पहावी लागते. त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नसतानाही घाईघाईत हा निर्णय घेताला. तो आम्हा पिंपरी-चिंचवडकरांवर अन्यायकारक आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पिंपरी-चिंचवड महापालिकेत विलिनीकरण करावे, अशी मागणी आहे. तसे सविस्तर पत्रही दिले आहे. अधिवेशनात लक्षवेधी किंवा प्रश्नोत्तराच्या तासात संधी मिळेल. तरीही औचित्याच्या मुद्दा मांडण्याची संधी मिळली, तेव्हा मी शहरवासीयांची भूमिका मांडली.”
>
> - **महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना विश्वासात घेतले नाही...

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या जमिनीनुसार मूळ शेतकऱ्यांना सहा टक्के जागा आणि सहा टक्के चटई क्षेत्र निर्देशांक या स्वरूपात परतावा देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे ३० वर्षांपासून जमीन परताव्याची वाट पाहणाऱ्या प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न भाजपाने केला होता. मात्र, राज्यातील सरकार २०१९ मध्ये बदलले. त्यामळे हा विषय मागे पडला आहे. महाविकास आघाडी सरकारने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्राधिकरण वासीयांना विचारात न घेता विलीनीकरणाचा निर्णय घेण्यात आला. त्यात विलीनीकरण करताना शेतकऱ्यांच्या परताव्याचा विषय दुर्लक्षीत, १९७२ ते १९८४ मधील शेतकऱ्यांना साडेबारा टक्के परतावा मिळाला नाही , असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

---

# पिंपरी-चिंचवडच्या जडण-घडणीतील शिलेदारांचा सन्मान

## विधायक उपक्रम : माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांचा पुढाकार

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पिंपरी-चिंचवड शहराचे ग्रामपंचायत, नगरपालिका ते महापालिका जडण-घडणमध्ये शहराला महत्वपुर्ण योगदान देणार्या आजी- माजी सरपंच, नगराध्यक्ष, महापौर व पोलिस पाटील व त्यांच्या कुटूंबियांचा माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, प्रमुख मार्गदर्शक प्रकाशराव मीठभाकरे उपस्थित होते. तसेच, देश स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावणा-या आणि स्वातंत्र्य संग्रामात बलिदान देणा-या स्वातंत्र्य सैनिक व कुटुंबियांचा देखील सन्मान करण्यात आला. नागरिकांच्या मनात देश प्रेमाची भावना निर्माण होण्यासाठी आणि देशाचा जाज्वल्य इतिहास पुढ़च्या पिढ़ीला स्मरण राहुन प्रेरित व्हावा, या उददेशाने "क्रांतीविर चापेकर नगर" येथे ३०० पेक्षा अधिक महान क्रांतीकारकांचे चित्रप्रदर्शन व माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले होते. यानिमित्त, मधुकर भोंडवे, कविचंद भाट, बबनराव चिंचवडे, सुभाष चिंचवडे, उषा उर्फ माई ढोरे, उर्मिला काळभोर आदी आजी माजी पदाधिकारी यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

स्वातंत्र्यवीर चापेकर नगर, स्पाईन रोड, चिंचवडे नगर (जुने रावजी गार्डन) याठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये, स्वातंत्र्य सेनानी, गोवा मुक्ती संग्रामातील सेनानी, आणीबाणीतील सत्याग्रही अथवा त्यांचे कुटूंबीय तसेच १९४७ साली स्वातंत्र्य दिवस पाहिलेले नागरिक यांचा सन्मान सोहळा पार पडला.

माजी महापौर उषा ऊर्फ माई ढोरे, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, सामाजिक कार्यकर्ते शेखर चिंचवडे, महिला मोर्चाच्या पल्लवी वाल्हेकर, मनोज तोरडमल, योगेश चिंचवडे, जनार्दन वाठरकर, प्रभाग अध्यक्ष भगवान निकम, बिभीषण चौधरी, कामगार आघाडी धिरज धाकड, प्रदीप पटेल, सचिन महाले, नवनाथ वाघमारे, संदीप महाजन, कैलास रोटे, रविंद्र कुवर, प्रल्हाद पाटील आदी उपस्थित होते.

१९७५ आणीबाणीत सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक, गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सेनानी, गोवा मुक्ती मोर्चातील सनिक व कुटुंबीयांचा सत्कार देखील या कार्यक्रमादरम्यान करण्यात आला. सुत्रसंचालन दिग्दर्शक व अभिनेता अविनाश आवटे यांनी केले.

## संपादकीय »

# 'कमळ'दलातील फेरबदल

***भारतीय जनता पक्ष आणि त्याचा पूर्वावतार असणाऱ्या भारतीय जनसंघाचा इतिहास पाहिला, तर पक्षाची सर्वसाधारण चौकट ओलांडणाऱ्या, पक्षाच्या नेतृत्वाला थेट किंवा अप्रत्यक्ष आव्हान देणाऱ्या किंवा यशस्वी नेत्याच्या मार्गात अडथळे आणणाऱ्या नेत्यांना कठोरपणे दूर केले जाते.***

इतिहासात डोकावले, तर बलराज मधोक या जनसंघाच्या स्थापनेपासून अग्रभागी असणाऱ्या नेत्याला केवळ अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी न जमल्याने पक्षातून जावे लागले. अशी अनेक उदाहरणे आहेत. याचे कारण वाजपेयी हाच पक्षाचा सर्वाधिक लोकमान्य चेहरा होता; मात्र पुढे पक्षाला अभूतपूर्व यश मिळवून देणारे लालकृष्ण अडवाणी चौकट ओलांडून (आठवा : जिनागौरव) बोलू लागले, तेव्हा त्यांचे स्थान खर्रकन खाली उतरले. उद्या नरेंद्र मोदी किंवा अमित शहा यांच्याऐवजी आज संसदीय मंडळ किंवा केंद्रीय निवडणूक समितीत स्थानही नसलेले योगी आदित्यनाथ अधिक यशस्वी लोकनेते ठरले, तर ही द्वयीही मागे पडेल. तेव्हा भाजपच्या संसदीय मंडळ किंवा निवडणूक समितीमधील बदलांकडे केवळ व्यक्तिगत यशापयशाच्या चौकटीतून न पाहता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यापक उद्दिष्टांमधील एक साधन म्हणून पाहावे लागेल.

आजचे भाजपसम्राट मोदी हे काही वर्षांपूर्वीपर्यंत या 'सर्वोच्च संसदीय मंडळा'चे साधे सदस्यही नव्हते; मात्र त्यांनी लागोपाठ दोन वेळा भाजपला केंद्रात सत्तास्थानी आणले. तेव्हा त्यांना मनाप्रमाणे सध्या तरी पक्ष व सरकार चालविता यावे, हा ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांना संसदीय मंडळातून मिळालेल्या निरोपाचा अर्थ आहे. याचा अर्थ, गडकरी यांची राजकीय कारकीर्द संपली असा नाही. कधी वाजपेयी, तर कधी अडवाणी यांना विरोध करीत राहिलेले मुरली मनोहर जोशी कायम केंद्रीय वर्तुळात राहिलेच. आजही भाजपचे जे (सुप्तावस्थेतील) मार्गदर्शक मंडळ आहे; त्यात मोदी, अडवाणी, जोशी आणि राजनाथ सिंह असे चार सदस्य सध्या आहेत. तेव्हा या मंडळात जाणे, याचाही अर्थ राजकारण संपणे असा नाही. संसदीय मंडळ किंवा निवडणूक समितीमधील नावे पाहिली, तर मोदी व शहा ही दोनच नावे महत्त्वाची आहेत. इतर सर्वांना त्यांच्या इच्छेने स्थान मिळाले आहे. त्यात एकही निवडणूक जिंकू न शकलेले किंवा केवळ एखाद्या राज्याला प्रतिनिधित्व द्यायचे म्हणून प्रतीक रूपाने तेथे आहेत. यातले देवेंद्र फडणवीस यांचे नाव म्हणजे त्यांच्यावरच्या मोदींच्या विश्वासाची खूण आहे. फडणवीस हेच महाराष्ट्रातील भाजपचे सर्वांत महत्त्वाचे नेते आहेत, असा संदेश मोदींनी पुन्हा दिला आहे. तो मुख्यत: राज्य भाजपसाठी; तसेच फडणवीस यांच्याबद्दल अढी असू शकणाऱ्या अमराठी केंद्रीय नेत्यांनाही आहे. दक्षिणेतील भाजपची स्थिती व बिहारमधील अवनती यामुळे ४८ खासदारांच्या महाराष्ट्राचे महत्त्व कुणालाही समजू शकेल.



## आनंदी सकाळ

# निर्मळ अंत:करणातील श्रद्धेने प्रसन्न होतात भगवान

धर्माचा राजाश्रय संपला. विविध विद्या व कला लोप पावू लागल्या. ऐहिक भोगेच्छा बळावल्या. परमार्थाचा जगण्याशी संबंध उरला नाही. अशा प्रतिकूल पतनकाळात भगवान श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोटला अवतरले. यतिराज स्वामी समर्थांचे वैराग्य भगवान शिवासारखे, तेज प्रखर सूर्यासारखे, भक्तांसाठी वात्सल्य मातेप्रमाणे व दुष्ट-उन्मत्तांसाठी कठोर शासन. भगवान श्री स्वामी समर्थ अनादिसिद्ध, दीनबंधू-दु:खितांना परमआधार, एकमेव, नित्य द्वंद्वातीत, भावातीत विमल, अचल, त्रैलोक्यपालक, परमेश्वराचे अनुभवगम्य सद्गुरू रूप आहे. अत्यंत संकटांनी घेरलेल्यांना रंजल्या-गांजलेल्यांना, दीन, हीन पतितांना भगवान श्री स्वामी महाराज - 'भिऊ नकोस मी पाठीशी आहे!' असा बळकट श्रद्धेचा आधार व मनोबल देतात. परंतु, त्यासाठी भक्ताने अहंकाराचा विलय करून विनम्रतेने ईश्वराच्या चरणी समर्पित, शरणागत होऊन मनोभावाने सेवा रूजू केली पाहिजे. भगवान निर्मळ अंत:करणातील श्रद्धेने प्रसन्न होतात.

# नकोसे झालेले लोक!



## भूमिका



रोहिंग्या निर्वासितांना राजधानी दिल्लीत पक्की घरे दिली जातील या गृहबांधणीमंत्री हरदीप पुरी यांच्या घोषणेवर गृहमंत्री अमित शहा यांच्या गृह खात्याने जे पाणी ओतले तो केंद्र सरकारातील 'गृहकलह' म्हणता येईल. रोहिंग्यांना घरे दिली जातील या घोषणेच्या बातमीची शाई वाळायच्या आत गृहबांधणीमंत्र्यांची ही घरबांधणी गृहमंत्र्यांनी जणू बुलडोझरने जमीनदोस्त केली. 'या स्थलांतरितांना घरेबिरे देण्याचा कोणताही प्रस्ताव नाही', इतक्या नि:संदिग्धपणे पुरी यांच्या घोषणेची पुरती वासलात लावली गेली. हे असे होते. वास्तविक हे पुरी राजकारणात येण्याआधी सनदी अधिकारी होते. त्या पदांवरून जनसेवेची हौस पुरती न पुरवली गेल्यामुळे बहुधा त्यांना राजकारणात यावेसे वाटले असेल. त्यात पुरी परराष्ट्र-सेवेशी संबंधित. या सेवेतील अधिकारी ठोस निर्णयाखेरीज बोलत नाहीत. त्याच वेळी या मंडळींचा पार्श्वभूमीचा चोख अंदाज असतो. तरीही आपण कोणत्या सरकारात आहोत, त्यांचे रोहिंग्यांबाबत धोरण काय आदी मुद्दे जगजाहीर असतानाही त्यांच्याकडून असा प्रमाद कसा काय घडला हा प्रश्नच. जे घडले त्यातून केंद्र सरकारचे हसे झाले यापेक्षा बरेच काही अधिक झाले. 'आप' आणि केंद्र सरकार यांच्यातही यानिमित्ताने जुंपली. हे सारे राजकीय कवित्व आणखीही काही काळ सुरू राहील. पण या राजकारणास बाजूला सारून विषय निघालेला आहेच तर त्यानिमित्ताने या रोहिंग्यांच्या केविलवाण्या अवस्थेची दखल घ्यायला हवी.

पूर्वीचा ब्रह्मदेश आणि आताचा म्यानमार या देशातील रखाईन (पूर्वीचा अराकान) नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रांतात हे रोहिंग्या जमातीचे लोक प्राधान्याने आढळतात. सरसकट समज असा की रोहिंग्या म्हणजे मुसलमानच. पण तसे नाही. यांतील बहुतांश मुसलमान आहेत हे खरे, पण रोहिंग्यांत थोडेफार हिंदूही असतात, हेही तितकेच खरे. हे सर्व रोहिंग्ये म्यानमारचे अधिकृत नागरिक नाहीत. बौद्धधर्मीय म्यानमार या प्रामुख्याने मुसलमान रोहिंग्यांस आपले नागरिक म्हणून मानण्यास तयार नाही. म्यानमार त्या सर्वास बांगलादेशी मानतो. आणि बांगलादेश हे सर्व म्यानमारचे आहेत म्हणून त्यांना अव्हेरतो. रोहिंग्या स्वत:ला म्यानमारचेच मानतात. त्यांतील अनेकांकडे त्यांच्या म्यानमारी इतिहासाचे तपशीलवार दाखले आहेत. तरीही त्या देशातील क्रूर राजवट त्यांना आपले मानत नाही. त्या लष्करी राजवटीचा चेहरा लक्षात घेता रोहिंग्यांबाबतचा त्यांचा दृष्टिकोन अधिक काही प्रागतिक असणे अशक्य. पण दुर्दैव हे की मानवी हक्क, शांतता वगैरेंसाठी नोबेल मिळवणाऱ्या, त्या देशाचा प्रागतिक चेहरा असलेल्या आँग साँग सू ची यादेखील रोहिंग्यांस झिडकारतात. आता या बाई पुन्हा तुरुंगात आहेत. पण सत्तेवर होत्या तेव्हाही त्यांनी रोहिंग्यांना झिडकारलेच. इतकेच नव्हे तर त्यांच्या सरकारी शिरकाणासही थांबवले नाही. मानवी हक्कांच्या पायमल्लीविरोधात वगैरे लढणाऱ्या सू ची यांनीही आपल्या वर्तनातून रोहिंग्यांच्या किमान हक्कांची पायमल्लीच केली. अशा वेळी या रोहिंग्यांसमोर एकच पर्याय राहतो.

# गडकरींचेच पंख कसे कापले जातात?

**भाजपच्या संसदीय समितीत आता नितीन गडकरी नाहीत... यामुळे गडकरींना काही फरक पडणारही नाही, पण समितीत हा फरक का पडला असेल?**



'लोकशाहीत विरोधी पक्षाला कमालीचे महत्त्व आहे. त्यामुळे ही व्यवस्था अधिक सुदृढ होण्यासाठी काँग्रेस पक्ष जिवंत राहायला हवा... ', 'गांधी, नेहरू, पटेलांच्या काळात राजकारण समाजकारणाशी जोडले गेले होते. समाजाच्या हितासाठी व्यवस्था परिवर्तन करणे हेच राजकारणाचे ध्येय होते. आता राजकारण केवळ सत्ताकारणापुरते सीमित झाले आहे. त्यामुळे ते सोडून द्यावे असा विचार मनात कधी कधी येतो', 'राजकारणात यशाचे श्रेय घेण्यासाठी खूपच चढाओढ सुरू असते पण अपयशाचे धनी व्हायला कुणी तयार नसते. राजकीय पक्षाच्या नेत्यांनी अपयशाची जबाबदारीसुद्धा स्वीकारायला हवी.' ही तीनही विधाने आहेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची. तीही अलीकडच्या काळात म्हणजे 'मोदीपर्वात' केलेली. आता याच काळात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा व इतर अनेक नेत्यांनी केलेली विधाने बघा. 'काँग्रेसमुक्त भारत' हे त्यापैकी एक. 'लवकरच देशातले इतर पक्ष अस्ताला जातील. प्रादेशिक पक्षसुद्धा संपतील व केवळ भाजप हा एकमेव पक्ष देशात शिल्लक राहील' हे अलीकडे वादग्रस्त ठरलेले दुसरे विधान. एकाच पक्षातून आलेली ही विधाने परस्परविरोधी. या पार्श्वभूमीवर गडकरींना संसदीय मंडळातून डावलले जाण्याच्या निर्णयाकडे बघायला हवे.

आता दोन दिवसांपूर्वीची गोष्ट. राष्ट्रीय पातळीवरील एका वाहिनीने देशातील लोकप्रिय नेत्यांची क्रमवारी जाहीर केली. त्यासाठी एका सर्वेक्षणाचा आधार घेण्यात आला. यात मोदींनंतर गडकरींचा क्रमांक होता. अमित शाह तिसऱ्या स्थानावर होते. या वाहिनीवर या बातमीचे आयुष्य केवळ दोन मिनिटांचे ठरले. नंतर ती बेपत्ता झाली. गडकरींच्या लोकप्रियतेने देशभरातील इतर राजकीय पक्ष आनंदित होत असले तरी भाजपतील वरिष्ठांच्या वर्तुळाचे विचार निराळे असावेत, याची कल्पना आल्यामुळेच कदाचित ही बातमी अल्पजीवी ठरली असावी.

राजकारणात अनेकदा लोकप्रियता हा शाप ठरत असतो. उजव्या विचारांशी एकनिष्ठ असूनही गडकरींना या शापाचे धनी अनेकदा व्हावे लागले आहे. ते महाराष्ट्रात विरोधी पक्षनेते असतानाची गोष्ट. ऐन विधान परिषद निवडणुकीच्या वेळी त्यांचा पाय मोडला. त्यामुळे बराच काळ ते घरीच होते. हे निमित्त साधून त्यांच्याऐवजी प्रकाश जावडेकरांना हे पद देण्याच्या हालचाली पक्षात सुरू झाल्या. तेव्हा जावडेकरसुद्धा परिषदेवर निवडून द्यायच्या एका जागेवरून रिंगणात होते. नंतर निकाल लागला. त्यात जावडेकर पडले तर गडकरी घरी बसून निवडून आले व हे पद हिरावण्याचे मनसुबे हवेत विरले. एखाद्याची लोकप्रियता अनेकांच्या मनात असूया निर्माण करत असते. गडकरींना आरंभापासून याचा सामना करावा लागला तोही स्वपक्षीयांकडून, विरोधकांकडून नाही. आज गडकरी हे देशातील उजव्या विचारधारेचे एकमेव नेते आहेत, ज्यांना राजकीय कारकीर्दीत वेळोवेळी सामना करावा लागला तो पक्षांतर्गत विरोधकांशीच, विरोधी राजकीय विचारधारा बाळगणाऱ्यांकडून त्यांचे कौतुकच होत राहिले.

## ।। अभंगवाणी ।।



वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चिंतीं देव नाहीं ॥१॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्र्यांचे दहीहंडी पर्यटन!

## उत्सव भेटीच्या माध्यमातून पालिका निवडणुकीचे शक्तीप्रदर्शन

।मुंबई ।महाईन्यूज ।

दोन वर्षांच्या खंडानंतर राज्यभर दहीहंडी उत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन केले गेले आहे. अनेक ठिकाणी लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांनी मेगा दहीहंडी कार्यक्रमांचे आयोजन केलं आहे. विशेषतः मुंबई आणि ठाण्यात लाखोंची बक्षिसे ही पुन्हा एकदा दहीहंडी उत्सवाचे आकर्षण ठरले आहेत. राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते यांचा मोठा उत्साह या उत्सवाच्या आयोजनात दिसत आहे. विशेषतः महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता नेतेमंडळी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करत एक प्रकारे शक्तिप्रदर्शन करतांना बघायला मिळत आहेत.



यानिमित्ताने शिवसेनेत बंडखोरी केलेले मुख्यमंत्री एखनाथ शिंदे यांनी आज दिवसभर विविध दहीहंडी मंडळ, लोकप्रतिनिधींनी आयोजीत केलेल्या उत्सवाच्या ठिकाणांना भेटी देण्याचा जंगी कार्यक्रम आखलेला बघायला मिळत आहेत. यानिमित्ताने समर्थकांनी आयोजित केलेल्या दहीहंडी उत्सवाला भेटी देत शक्तिप्रदर्शन करण्याचा, एक प्रकारे हिंदुत्वाचा पुकार करण्याचा एकनाथ शिंदे यांचा प्रयत्न दिसत आहे.आज दिवसभरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मीरा भाईंदर, मुंबई, भिवंडी आणि ठाणे इथल्या ११ दहीहंडी कार्यक्रमाच्या ठिकाणी भेटी देत आहेत. यानिमित्ताने सत्ता स्थापनेत मोलाची साथ देणाऱ्या विविध सहकाऱ्यांनी आयोजित केलेल्या दहीहंडी कार्यक्रमांना शिंदे भेटी देणार आहेत. घाटकोपर, मागाठाणे, भिवंडी इथे प्रत्येकी एका ठिकाणी तर ठाण्यात सहा ठिकाणी ते भेट देत आहेत. यानिमित्ताने एक प्रकारे पालिका निवडणुक प्रचाराची पहिली पायरी शिंदे चढत असल्याचं म्हंटलं जात आहे.

### शॉर्ट न्यूज

**"आम्ही ५० थरांची हंडी फोडली" - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

। मुंबई ।।महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यातील टेंभी नाका येथील दहीहंडी उत्सवाला हजेरी लावली. यावेळी केलेल्या भाषणातून एकनाथ शिंदे यांनी राजकीय टोलेबाजी केली आहे. दीड महिन्यापूर्वी आम्हीदेखील ५० थरांची हंडी फोडली असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या कार्यक्रमाला सिनेअभिनेत्री श्रद्धा कपूरसह हजारो गोविंदा उपस्थित होते.

टेंभी नाका येथे दहीहंडी पथकातील गोविंदांना संबोधित करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, "धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरू केलेला दहीहंडी उत्सव आता संपूर्ण महाराष्ट्रभर फोफावला आहे. मुंबईतला प्रत्येक गोविंदा टेंभी नाक्याला सलामी देऊन पुढे जातो. हा आपला इतिहास आणि परंपरा आहे. ही परंपरा वाढवण्याचं आणि जोपासण्याचं काम आपलं आहे. ठाण्याचा मुख्यमंत्री झाला पाहिजे, असं आनंद दिघे यांचं स्वप्न होतं. त्यांच्या पुण्याईमुळे आणि आशीर्वादामुळे मला मुख्यमंत्री म्हणून या दहीहंडीला उपस्थित राहता आलं, हे मी माझं भाग्य समजतो."

# दोन दिवसांमध्ये राज्यातील पीकांची पाहणी केली जाणार : अब्दुल सत्तार यांचे मोठे वक्तव्य...!

।नागपूर ।महाईन्यूज ।

अतिवृष्टीने खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे. जुलै अन् ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसामुळे तब्बल 15 लाख हेक्टराहून अधिकच्या क्षेत्रावरील (CROP DAMAGE) पिके ही पाण्यात आहेत. त्यामुळे राज्यात ओल्या दुष्काळाची घोषणा करावी अशी मागणी विधीमंडळात विरोधकांनी केली आहे. मात्र, ओल्या दुष्काळासारखी स्थिती नाही. शिवाय त्यासाठी वेगळे नियमही असतात असे अब्दुल सत्तार यांनी सांगितले होते. पण नुकसानभरपाईबाबत आता सोमवारी निर्णय घेतला जाणार असल्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले आहे. शिवाय दोन दिवसांमध्ये राज्यातील पीकांची पाहणी केली जाणार आहे. त्यानुसार



मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. मदत रकमेची वाटप नेमकी केव्हापासून सुरु होणार याबाबत मुख्यमंत्री किंवा कृषिमंत्री म्हणून मी सोमवारी सभागृहात घोषणा करणार असल्याचे सत्तार यांनी नागपुरात सांगितले आहे. त्यामुळे नुकसानभरपाईबाबत शेतकऱ्यांना सोमवारी दिलासा मिळेल असे चित्र आहे. अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे. आतापर्यंत विरोधक आणि प्रशासनाकडूनही पीक पाहणी झालेली आहे. आता प्रत्यक्ष नुकासानभरपाई अदा करण्याच्या प्रसंगीच कृषीमंत्री अब्दुल सत्तार हे

### कृषीमंत्री सत्तार विदर्भाच्या दौऱ्यावर

कृषी खात्याचा पदभार घेतल्यानंतर अब्दुल सत्तार हे प्रथमच विदर्भात दाखल झाले आहेत. यंदा सर्वाधिक पाऊस हा याच विभागात झाला असून धान पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे आता भरपाईबाबत राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. जिरायतील हेक्टरी 13 हजार 600 अशी रक्कम ठरवण्यात आली आहे. मात्र, त्यानुसार मदत मिळणार आहे. मदत निधीपूर्वी कृषी मंत्री हे पीक पाहणीसाठी विदर्भात दाखल झाले आहेत सत्तार हे नागपूर, वर्धा, अमरावती या जिल्ह्यातील पिकांची पाहणी करुन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

### सभागृहात प्रत्यक्ष मदत रक्कम वाटपाची घोषणा

गेल्या अनेक दीड महिन्यापासून राज्यात अतिवृष्टी आणि सततचा पाऊस झालेला आहे. त्यामुळे खरिपातील पिकांचे तर नुकसान झालेच आहे पण फळबागाही आडव्याच आहेत. राज्यात ओला दुष्काळ जाहीक करावा या मागणीसाठी विरोधक हे आक्रमक आहेत. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले जात आहे. घोषणा झाली पण प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हा होणार असा सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत सोमवारी घोषणा केली जाणार आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर नेमकी कधी रक्कम जमा होणार याबाबत सांगितले जाणार असे अब्दुल सत्तार यांनी सांगितले आहे.

# शहाजीबापूंच्या सांगोल्यात विनायक राऊत घेणार सभा!

।मुंबई ।महाईन्यूज ।

राज्यात शिवसेनेत मोठी फूट पडत असताना त्यात एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेलेले आणि ' काय झाडी..काय डोंगार..काय हॉटेल..समदं ओक्केमंदी..' या अफलातून संवादाने गाजलेले आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांच्या सांगोला मतदारसंघात त्यांच्या विरोधात शिवसेनेने एल्गार पुकारला आहे. त्यासाठी येत्या रविवारी शिवसेनेचे सचिव, खासदार विनायक राऊत हे शहाजीबापू पाटील यांच्या घरच्या मैदानात येणार आहेत.

राज्यात नाट्यमय राजकीय घडामोडी घडून शिवसेनेत मोठी फूट पडल्यानंतर अडचणीत आलेला पक्ष सावरण्यासाठी शिवसेनेने जोरदार तयारी सुरू केली आहे. सोलापूर जिल्ह्यात



विशेषतः सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांना लक्ष्य करण्याचे शिवसेनेने ठरविले आहे. येत्या रविवारी दुपारी बारा वाजता खासदार विनायक राऊत हे सांगोल्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहात आयोजित जाहीर सभेत आमदार शहाजीबापू पाटील यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडणार आहेत. रांगड्या स्वभावाचे आमदार शहाजीबापू पाटील हे सुध्दा फर्डे वक्ते आहेत. ते आपल्या माणदेशी भाषेतून खासदार राऊत यांच्यासह शिवसेनेला कशाप्रकारे प्रत्युत्तर देणार, याचीही सार्वत्रिक उत्सुकता आहे.

## गोविंदांत आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने राज्यात सर्वत्रच राजकीय पक्षांनी सक्रिय सहभाग

# दहीहंडीच्या माध्यमातून मतांची पेरणी!

### भाजपचा सक्रिय सहभाग, शिवसेनेवर कुरघोडी

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

करोनामुळे दोन वर्षांच्या खंडानंतर झालेल्या गोविंदांत आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, वसईसह राज्यात सर्वत्रच राजकीय पक्षांनी सक्रिय सहभाग घेऊन आगामी निवडणुकांच्या दृष्टीने एक प्रकारे मतांची पेरणीच केली. गोविंदा किंवा अन्य सणांमध्ये आतापर्यंत शिवसेनेचे वर्चस्व असायचे, यंदा मात्र भाजपने मुंबई, ठाण्यात दहीहंडीच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करीत शिवसेनेवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला.

गेले दोन वर्षे सण-समारंभावर निर्बंध होते. यंदा निर्बंधमुक्त गोविंदा असल्याने सारेच राजकीय पक्ष उत्साहात सहभागी झाले होते. लवकरच मुंबई, ठाण्यासह १५ महानगरपालिका, २०० पेक्षा अधिक नगरपालिका, २५ जिल्हा परिषदांच्या निवडणुका अपेक्षित आहेत. या दृष्टीने भाजप, शिवसेना, शिवसेनेतील शिंदे गट, काँग्रेस, मनसे, राष्ट्रवादी साऱ्याच राजकीय पक्षांनी मतदारांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न दहीहंडीच्या माध्यमातून केला. गणेशोत्सव, दहीहंडी या सणांवर आतापर्यंत शिवसेनेचे वर्चस्व असायचे. त्यानंतर मनसे व काही प्रमाणात राष्ट्रवादीचा सहभाग असायचा. यंदाच्या दहीहंडीचे वैशिष्ट्य म्हणजे शिवसेनेच्या बरोबरीनेच भाजपचा मुंबई, ठाण्यासह सर्वत्र सक्रिय सहभाग दिसला. मुंबईतील जांबोरी मैदान, ठाण्यातील दहीहंडीत भाजप नेत्यांच्या हंडय़ा लक्ष वेधून घेत होत्या. भाजपने सर्वत्र फोटो, पोस्टर, झेंडे या माध्यमातून वातावरणनिर्मिती केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छब्या सर्वत्र लक्ष वेधून घेत होत्या. ठाण्यातील टेंभी नाका या एके काळच्या शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात प्रथमच दहीहंडीमध्ये पंतप्रधान मोदी यांचा फोटो झळकला होता. राज्यात शिवसेना-भाजपची युती असताना आनंद दिघे यांच्या कार्यकाळात कधीही भाजप नेत्यांना या दहीहंडीत स्थान नसायचे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र भाजपला झुकते माप दिले होते.



## दहीहंडी उत्सवात फडणवीसांचे तुफाण भाषण



राज्यभरात दहींहडी उत्सव उत्साहात साजरा केला जातोय. राजधानी मुंबईतही राजकीय नेत्यांनी मोठ्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले असून यामध्ये अनेक गोविंदा पथकांनी भाग घेतला आहे. या उत्सवाला वेगवेगळ्या पक्षांचे नेतेदेखील उपस्थिती दर्शवत आहेत. भाजपा नेते प्रकाश सुर्वे यांनी मागाठाणे येथे आयोजित केलेल्या दहीहंडी उत्सवाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी हजेरी लावली. यावेळी त्यांनी भाषण करून गोविंदांचा उत्साह वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गोविंदा आता खेळाडू आहेत. खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा आता गोविंदांना दिल्या जातील, असे सांगितले. तसेच सर्व सविधा मिळाल्यामुळे गोविंदांना आता मोकळं-मोकळं वाटतंय. छान वाटतंय, असं मिश्किल भाष्यदेखील केलं. यावेळी फडणवीस यांच्यासोबत भाजपाचे इतर नेतेदेखील उपस्थित होते."आता आपले सरकार आहे. आपले सकार आल्यानंतरर दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा केला जातो. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जातो. एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे, की आता गोविंदा हे खेळाडू असतील. दहीहंडी आता साहसी खेळ आहे. खेळाडूच्या सर्व सुविधा आता गोविंदांना दिल्या जातील. कोणी जखमी झालं तर सरकार तुमच्या पाठीशी आहे. त्यामुळे आता कसं वाटतंय, मोकळं मोकळं वाटतंय. छान छान वाटतंय," असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच आता आपण भ्रष्टाचाराची हंडी फोडू आणि विकासाच्या हंडीतून शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचवण्याचं काम आपण करू, असेही फडणवीस म्हणाले.

## विविध पक्षांचा सहभाग

मनसे, राष्ट्रवादी व काँग्रेसचे नेतेही दहीहंडीत सहभागी झाले होते. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आमदार भाई जगताप यांनी विविध मंडळांना भेटी दिल्या. दक्षिण मुंबईतील दहीहंडय़ांना माजी खासदार मिलिंद देवरा यांनी भेटी दिल्या.

### गोविंदा आरक्षणावरून वादाची चिन्हे; पृथ्वीराज चव्हाण

दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्याबरोबरच गोविंदांना राज्य शासनाच्या सेवेत खेळाडूंसाठीच्या कोटय़ातून आरक्षण देण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेवरून वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये पदके मिळवून जागतिकस्तरावर लौकिक प्राप्त करून देणाऱ्या खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणात गोविंदानाही वाटेकरी करणे म्हणजे खेळाडूंसांठीच्या आरक्षणाच्या मुख्य उद्देशालाच बाधा आणणारा हा निर्णय होऊ शकतो, असे टीकेचे सूर निघत आहेत. राज्यात दहीहंडी सणाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी विधानसभेत दहीहंडीला साहसी दर्जा देण्याची तसेच गोविंदांना शासकीय सेवेत खेळाडू म्हणून आरक्षण लागू करण्याची घोषणा केली. ही पूर्णपणे राजकीय व लोकानुनय करणारी घोषणा असल्याची राजकीय वर्तुळातून टीका होऊ लागली आहे. गोविंदांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय चुकीचा व अर्थहीन आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केली.

---

## डोलो-६५० गोळ्यांच्या विक्रीसाठी १००० कोटींचे गिफ्ट्स दिल्याचं प्रकरण सर्वोच्च न्यायालयात



**।नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

करोना काळात मोठ्या प्रमाणात चर्चेत राहिलेल्या डोलो-६५० गोळ्यांची अधिक विक्री व्हावी यासाठी मायक्रो लॅब्स लिमिटेड या औषध कंपनीने डॉक्टरांना तब्बल १,००० कोटी रुपयांचे गिफ्ट वाटल्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहचला आहे. या प्रकरणी एका स्वयंसेवी संस्थेने याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड आणि ए. एस. बोपन्ना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी कठोर निरिक्षणे नोंदवली. त्यांना स्वतःला कोविड झाला तेव्हा डॉक्टरांनी त्यांनाही डोलो ६५० गोळ्या घेण्याचा सल्ला दिल्याचा धक्कादायक खुलासा केला. तसेच हे प्रकरण गंभीर असल्याचं नमूद केलं. फेडरेशन ऑफ मेडिकल अँड सेल्स असोसिएशन ऑफ इंडियाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

## "नितीन गडकरींबाबत नेमकं हेच घडलंय"

### काँग्रेसचं खोचक ट्वीट; पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला!

**।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

केंद्रातील एनडीए सरकारमधल्या कार्यक्षम मंत्र्यांमध्ये रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरींचं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. गडकरींचा कामाचा वेग आणि त्यांची प्रशासनावरची पकड या गोष्टींची नेहमीच राजकीय वर्तुळात चर्चा होत असते. गडकरींच्या कार्यक्षमतेचे अनेक दाखले देतानाच अनेकदा त्यांच्याकडे पंतप्रधानपदाचा सक्षम पर्याय म्हणूनही पाहिलं जातं. त्यामुळे अशा कार्यक्षम मंत्र्याचा सरकारमध्ये बोलबाला असणं ही फार साहजिक बाब मानली जाते. मात्र, भाजपानं नुकत्याच जाहीर केलेल्या पक्षाच्या संसदीय बोर्डामधून चक्क नितीन गडकरींना वगळण्यात आलं आहे. हे



**गडकरींच्या कार्यक्षमतेचे अनेक दाखले देतानाच अनेकदा त्यांच्याकडे पंतप्रधानपदाचा सक्षम पर्याय म्हणूनही पाहिलं जातं. त्यामुळे अशा कार्यक्षम मंत्र्याचा सरकारमध्ये बोलबाला असणं ही फार साहजिक बाब मानली जाते. मात्र, भाजपानं नुकत्याच जाहीर केलेल्या पक्षाच्या संसदीय बोर्डामधून चक्क नितीन गडकरींना वगळण्यात आलं आहे. हे पाहून अनेक राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यासंदर्भात आता काँग्रेसनं खोचक शब्दांत भाजपावर टीका करत नितीन गडकरींना वगळण्यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.**


पाहून अनेक राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यासंदर्भात आता काँग्रेसनं खोचक शब्दांत भाजपावर टीका करत नितीन गडकरींना वगळण्यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

बुधवारी भाजपाकडून पक्षाच्या संसदीय मंडळाची यादी जाहीर करण्यात आली. या यादीमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्येष्ठ नेते शिवराज सिंह चौहान यांना वगळण्यात आल्याचं दिसून आलं. या यादीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, अमित शाह, बी. एस. येडियुरप्पा, सर्बानंद सोनोवाल, के. लक्ष्मण,. इकबालसिंह लालपुरा, सुधा यादव, सत्यनारायण जटिया आणि बी. एल. संतोष यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे गडकरी आणि चौहान यांना वगळून त्याच्याजागी नव्या मंडळात येडियुरप्पा आणि सरबानंद सोनोवाल यांना संधी देण्यात आली आहे.

# सनी लिओनीचं बॉलिवूडबाबत मोठं वक्तव्य, काम मिळत नसल्याची खंत

अभिनेत्री सनी लिओनीने बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्याबाबत आपलं मत व्यक्त केलं आहे.


बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यापूर्वी सनी लिओनीची एक पॉर्नस्टार म्हणून ओळख होती. अर्थात सनीला तिच्या भूतकाळाबद्दल कोणत्याही प्रकारचा पश्चाताप नाही. हे तिने स्वतः बऱ्याच मुलाखतींमध्ये खुलेपणाने सांगितलं आहे. बॉलिवूडमध्ये पदार्पण करून सनीला दहा वर्षांपेक्षा अधिक काळ झाला आहे. तरीही तिचा भूतकाळ अद्याप तिची पाठ सोडायला तयार नाही. याबाबत खुद्द सनीने एका मुलाखतीदरम्यान सांगितलं आहे. सनीने २०१२मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जिस्म २' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. याबाबत बोलताना तिने सांगितलं की, "२०१२मध्ये चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण करणाऱ्या व्यक्तींमध्ये मी खूप वेगळी होती. नेहमीच चांगलं कायतरी घडलं पाहिजे यासाठी मी विचार करत असते. मला या देशामध्ये राहायला आवडतं. या चित्रपटसृष्टीबाबत मला प्रचंड प्रेम आहे. मला आतापर्यंत ज्या भूमिका करायला मिळाल्या त्याबाबत मी फार खूश आहे." पण काम करत असताना काही वाईट अनुभवही आले. त्यामधूनच मला



अधिक शिकायला मिळायलं. ज्यांनी मला सतत पाठिंबा दिला त्या सगळ्या चाहत्यांचे मी आभार मानते. कारण आज मी जे काही आहे हे माझ्या चाहत्यांमुळेच शक्य झालं आहे." सनीने पुढे बोलताना तिला आता चित्रपटसृष्टीमध्ये काम मिळतं का? याबाबत सांगितलं. सनी म्हणाली, "मी जेव्हा चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केलं तेव्हा काही जणं माझ्याबरोबर काम करणं टाळायचे. पण काही लोक असेही होते की ज्यांना माझ्याबरोबर काम करण्याची इच्छा होती. मात्र आजही नावाजलेले प्रोडक्शन हाउस आणि सुप्रसिद्ध कलाकार माझ्याबरोबर काम करणं टाळतात." सनी दिग्दर्शक अनुराग कश्यपच्या आगामी चित्रपटामध्ये काम करताना दिसणार आहे.

# 'तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती', अभिनेत्री कियारा आडवाणी झाली ट्रोल


अभिनेत्री कियारा आडवाणी ही बॉलिवूडमध्ये आपली ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. तिच्या चित्रपटांमुळे, तिच्या ग्लॅमरस फोटोंमुळे ती सर्वांचे लक्ष वेधून घेत असते. गेल्या काही दिवसांपासून अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री कियारा आडवाणी यांच्या अफेअरच्या जोरदार चर्चा रंगल्या आहेत. ही दोघं बऱ्याच समारंभात एकत्र दिसतात. मात्र, याबद्दल अद्याप दोघांनीही अधिकृत माहिती दिलेली नाही. आता पुन्हा एकदा कियारा सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनली आहे. यावेळी मात्र तिला ट्रोलिंगचा




सामना करावा लागत आहे. सोशल मीडियावर कियाराचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये भर पावसात सिक्युरिटी गार्डला आपल्या डोक्यावर छत्री धरायला लावल्यामुळे कियारा ट्रोल झाली आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये कियारा तिच्या कारमधून उतरत असताना पाऊस सुरु झाला, त्यामुळे एक सिक्युरिटी गार्ड धावत तिच्याजवळ छत्री घेऊन आला. इतकंच नाही तर तिला पावसापासून वाचवण्यासाठी तो स्वतः मात्र भिजत होता. हे पाहून नेटकरी नाराज झाले. कियाराला पावसापासून वाचवण्यासाठी हा गार्ड स्वत: भिजत होता हे पाहून नेटकऱ्यांनी तिला खडे बोल सुनावले आहेत.

# 'हृदयी वसंत फुलताना' हे अजरामर गाणे पुन्हा नव्या रुपात

सध्या जुन्या चित्रपटांचा रिमेक करण्याची प्रथा सुरु झाली. बॉलिवूडची सर्जनशीलता संपली का? असा थेट सवाल टीकाकारांनी बॉलिवूडच्या मंडळींना केला. आजकालच्या हिंदी चित्रपटांमध्ये गाणी देखील जुन्या चित्रपटातील एखाद्या गाण्यांवरून घेतलेली असतात. सनी लियोनच्या मधुबन मै राधिका या गाण्यावरून बराच वाद झाला होता. मूळ गाणे हे दिलीपकुमार यांच्यावर चित्रित झाले होते. जुने गाणे शास्त्रीय संगीतावर आधारलेले होते. हिंदीनंतर आता मराठीत देखील हा प्रयोग होत आहे. टकाटक २ या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातील अजिंक्य राऊत या अभिनेत्याच्या किसिंग सीनवरून नेटकऱ्यांनी त्याला प्रचंड ट्रोल केलं. मन उडू उडू झालं या मालिकेत तो दिसला होता. आता याच चित्रपटातील एक गाणे आले आहे त्या गाण्याचं नाव आहे हृदयी वसंत फुलताना, तब्बल ३४ वर्षांपूर्वी आलेल्या अशी ही बनवा बनवी या अजरामर चित्रपटातील हे गाणे ४ अभिनेते आणि ४ अभिनेत्रींनवर चित्रित झाले होते. आजही जुने गाणे अनेकांच्या ओठी आहे. नव्या रंगात, नव्या ढंगात सादर आहे सदाबहार गाणं, 'हृदयी वसंत फुलताना' एका अनोख्या अंदाजात!!! असा कॅप्शन देऊन हे गाणे प्रदर्शित केले आहे. वरून लिखाते यांनी नव्या गाण्याला संगीत दिल आहे तर श्रुती राणे यांनी ते गायले आहे. एलेनाझ नोजुरी हिच्यावर गाणे चित्रित झाले आहे तर चित्रपटातील इतर कलाकार देखील गाण्यात दिसत आहेत.



# अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर दिसणार वेगळ्या माध्यमात



मालिका आणि चित्रपट विश्वातील एक लोकप्रिय चेहरा म्हणजे अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर. आभास हा या मालिकेतून तिने आपला अभिनय क्षेत्रातील प्रवास सुरू केला. 'रात्रीस खेळ चाले २'मध्ये तिने साकारलेली शेवंता या पात्राला तूफान लोकप्रियता मिळाली. परंतु ही मालिका काही कारणाने तिने मध्यातच सोडली. त्यानंतरही ती वेगवेगळ्या प्रोजेक्ट्समधून समोर आली. आता पुन्हा एकदा एका नव्या भूमिकेत ती आपल्याला दिसणार आहे. अभिनेत्री "अपूर्वा नेमळेकर" आता स्वयंभू स्टुडीओसच्या नव्या कलाकृतीमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. "द डीलीवरी बॉय" असे ह्या कलाकृतीचे नाव आहे. ही एक शॉर्टफिल्म आहे. ह्यात अपूर्वा नेमळेकर सोबतच अभिनेता सुजीत देशपांडे मुख्य भूमिकेत दिसणार आहे. भूमिका साकारल्या होत्या.

# 'लाल सिंग चड्ढा' पाहिल्यानंतर स्वरा भास्करचं ट्वीट

आमिर खानच्या 'लाल सिंग चड्ढा' चित्रपटाबाबत सध्या बऱ्याच चर्चा रंगत आहेत. 'बॉयकॉट लाल सिंग चड्ढा'बाबात तर बॉयकॉट लाल सिंग चड्ढा'बाबत कलाकार मंडळी आमिर खानला साथ देताना दिसत आहेत. आता अभिनेत्री स्वरा भास्करने याबाबत ट्वीट केलं आहे. स्वराने 'लाल सिंग चड्ढा' चित्रपट पाहिला. इतकंच नव्हे तर तिने ट्वीट करत आमिर तसेच चित्रपटाच्या संपूर्ण टीमचं कौतुक केलं. यामुळे स्वराला ट्रोल देखील करण्यात आलं आहे.

स्वरा ट्वीट करत म्हणाली, "मी 'लाल सिंग चड्ढा' चित्रपट पाहिला. आमिर खान म्हणजे एक देखणा शिख असंच म्हणावं लागेल. तसेच लिटल लाल आणि रुपा हे खूपच गोंडस आहेत. मोना सिंगने तर माझं मन जिंकलं." एरव्ही काही बॉलिवूड कलाकार तसेच हिंदी चित्रपटसृष्टीमधील इतर मुद्द्यांबाबत विरोधात बोलणाऱ्या स्वराने आमिरच्या चित्रपटाचं कौतुक केलं. स्वराच्या या ट्विटनंतर नेटकऱ्यांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. सुपरफ्लॉप चित्रपटाचं कौतुक करत आहेस, करीना कपूरवर तू जळतेस म्हणून तिचं कौतुक केलं नाहीस, चित्रपट जर चांगला असता तर ट्वीट करण्याची तुला गरज पडली नसती अशा अनेक कमेंट नेटकऱ्यांनी तिच्या ट्विटर केल्या आहेत. बऱ्याच कलाकार मंडळींनी व्यक्त होण्यास सुरुवात केली. आमिरला पाठिंबा देत बॉयकॉट करणं हा पर्याय नसल्याचं कलाकारांनी म्हटलं आहे. इतकंच नव्हे तर आपला चित्रपट पाहण्यासाठी आमिर, करीना कपूर खानने प्रेक्षकांना आवाहन केलं होतं. एकीकडे चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरत



असल्याचं चित्र आहे. तर दुसरीकडे अभिनेत्री स्वरा भास्करने (SWARA BHASKAR) या चित्रपटाबाबत केलेले ट्वीट चर्चेत आलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### क्रिप्टो चषक बुद्धिबळ स्पर्धा : प्रज्ञानंदचा सलग तिसरा विजय



**मियामी। महाईन्यूज**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने एफटीएक्स क्रिप्टो चषक बुद्धिबळ स्पर्धेतील विजयी घोडदौड सुरू ठेवताना गुरुवारी तिसऱ्या फेरीत अमेरिकेच्या हान्स निमनवर २.५-१.५ अशा फरकाने सरशी साधली. प्रज्ञानंदचा हा सलग तिसरा विजय ठरला.

१७ वर्षीय प्रज्ञानंदने पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये अनुक्रमे अलिरझा फिरौझा आणि अनिश गिरी या आघाडीच्या खेळाडूंना पराभूत केले होते. त्यामुळे तीन फेऱ्यांअंती नऊ गुणांसह प्रज्ञानंद गुणतालिकेत संयुक्तरीत्या अग्रस्थानी आहे. त्याचे आणि जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनचे समान गुण आहेत. कार्लसनने तिसऱ्या फेरीत अमेरिकेच्या अनुभवी लेव्हॉन अरोनियनचा २.५-१.५ असा पराभव केला. निमनविरुद्धच्या लढतीत प्रज्ञानंदला सुरुवातीला सर्वोत्तम खेळ करता आला नाही. त्याने या लढतीचा पहिला डाव गमावला.

भारत-झिम्बाब्वे एकदिवसीय मालिका

# राहुल सलामीला उतरणार?

## झिम्बाब्वेविरुद्धच्या उर्वरित एकदिवसीय मालिकेत भारताची नवी रणनीती

**। हरारे । महाईन्यूज ।**

झिम्बाब्वेविरुद्ध शनिवारी होणाऱ्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात कर्णधार केएल राहुलला फलंदाजीची संधी मिळेल अशी आशा आहे. याचप्रमाणे उर्वरित दोन एकदिवसीय सामन्यांत रणनीतीत बदल करण्याचे भारतीय संघाने ठरवले आहे.

राहुलने नाणेफेक जिंकल्यास प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. झिम्बाब्वेच्या संघात जिमी अँडरसन किंवा जोश हॅझलवूडच्या तोडीचे वेगवान गोलंदाज नसले तरी उसळत्या खेळपट्टीवर फलंदाजांचा कस लागेल. सुरुवातीच्या तासाभराच्या खेळात फलंदाजी करणे आव्हानात्मक ठरते. याचप्रमाणे दुसऱ्या डावात गोलंदाजांना खेळपट्टीकडून पुरेशी साथ मिळते, असे पहिल्या सामन्यानंतर दीपक चहरने म्हटले होते. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत शाहीन शाह आफ्रिदीला सामोरे जाण्यापूर्वी भारतीय फलंदाजांना यानिमित्ताने उत्तम सराव मिळू



शकेल. फलंदाजीत प्रयोगाची संधी पहिल्या सामन्यात शिखर धवन आणि शुभमन गिल या सलामीवीरांनी नाबाद अर्धशतके झळकावत १० गडी राखून भारताचा विजयाध्याय लिहिला.

इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर, तर राहुल चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरणार होता. झिम्बाब्वेची गोलंदाजी ही देशातील अव्वल स्थानिक संघाच्या क्षमतेची नसल्यामुळे राहुलला फलंदाजीत प्रयोग करण्याची संधी असेल. धवनला झालेली दुखापत गंभीर असल्यास इशान आणि राहुल या डाव्या-उजव्या जोडीचा पर्यायसुद्धा उपलब्ध आहे. दीपक हुडालाही फलंदाजीत प्राधान्यक्रम दिल्यास त्याचा आत्मविश्वास उंचावू शकेल.

### चहर-कृष्णावर भिस्त

वेगवान गोलंदाज चहरने सात षटके गोलंदाजी करीत तीन बळी घेत पुनरागमनाचा इशारा दिला आहे. प्रसिध कृष्णानेही तीन बळी घेत त्याला उत्तम साथ दिली. मोहम्मद सिराजने टिच्चून गोलंदाजी केली, पण त्याला अपेक्षित बळी मिळवता आले नाहीत. अक्षर पटेलने प्रभावी फिरकी गोलंदाजी करीत ७.३-२-२४-३ असे लक्षवेधी पृथक्करण राखले.

### खेळ सुधारण्याची गरज

पहिल्या सामन्यातील झिम्बाब्वेच्या डावात कर्णधार रेगिस चकाब्वा (३५), ब्रॅड इव्हान्स (नाबाद ३३) आणि रिचर्ड एन्गरव्हा (३४) यांनी महत्त्वाचे योगदान दिले होते. गोलंदाजीत आठ गोलंदाजांचा वापर करूनही झिम्बाब्वेला भारताच्या एकाही फलंदाजाला बाद करता आले नव्हते. त्यामुळे झिम्बाब्वेच्या फलंदाजांना व गोलंदाजांना पहिल्या सामन्यातून धडा घेत खेळ सुधारावा लागणार आहे.

# भुतियाचा भारतीय फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**



भारताचा माजी फुटबॉल कर्णधार बायच्युंग भुतियाने सध्या चर्चेत असलेल्या अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या (एआयएफएफ) निवडणुकीत थेट अध्यक्षपदासाठी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.

भुतियाने अर्ज केला असला तरी या पदासाठी सध्या आणखी एक माजी फुटबॉलपटू कल्याण चौबे यांचे पारडे जड मानले जात आहे. भुतियाच्या नावाला त्याचा संघसहकारी दीपक मोंडलने प्रस्तावित केले आणि मधू कुमारीने अनुमोदन दिले..

“माजी खेळाडूंना भारतीय फुटबॉलची सेवा करता यावी म्हणून सर्वोच्च न्यायालयाने नव्याने खेळाडूंना निवडणूक प्रक्रियेत सामावून घेण्याचा आदेश दिला आहे.

त्यानुसार मी खेळाडूंचा प्रतिनिधी म्हणून अर्ज दाखल केला आहे. खेळाडू म्हणूनच नाही, तर संघटक म्हणूनही खेळाडू चांगले काम करू शकतात, हे आम्हाला दाखवून द्यायचे आहे,” असे भुतिया म्हणाला.

### क्रीडा मंत्रालयाची विनंती

भारतातील श्री गोकुळम केरळ एफसी आणि एटीके मोहन बागान या क्लबच्या संघांना अखिल भारतीय फुटबॉल महासंघावरील बंदीनंतरही ‘एएफसी’ स्पर्धेत खेळू द्यावे, अशी विनंती क्रीडा मंत्रालयाने ‘फिफा’ आणि आशियाई फुटबॉल महासंघाला (एएफसी) केली आहे.

“माजी खेळाडूंना भारतीय फुटबॉलची सेवा करता यावी म्हणून सर्वोच्च न्यायालयाने नव्याने खेळाडूंना निवडणूक प्रक्रियेत सामावून घेण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार मी खेळाडूंचा प्रतिनिधी म्हणून अर्ज दाखल केला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही